


दैनिक अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २०३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०६ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## दैनिक अक्षराज वृत्ताची तात्काळ दखल;

## लक्ष्मी माता मंदिर परिसरात स्वच्छतेची हालचाल



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०५, राहुरी :** राहुरी खुर्द येथील लक्ष्मी माता मंदिर परिसरात साचलेल्या कचर्याबाबत दैनिक अक्षराज मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची ग्रामपंचायत प्रशासनाने तात्काळ दखल घेत परिसरात स्वच्छतेसाठी हालचाल सुरू केली आहे.

लक्ष्मी माता मंदिर परिसरात कचराकुंडी खराब झाल्यामुळे कचराकुंडी शेजारी मोठ्या प्रमाणावर कचरा साचला होता. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून नागरिक व भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवर दैनिक अक्षराज मध्ये वृत्त प्रसिद्ध होताच ग्राम पंचायत प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेतली.

मंदिर परिसरात दररोज मोठ्या संख्येने भाविकांची ये-जा असते. त्यामुळे स्वच्छतेच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली होती. वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर ग्रामपंचायतीकडून परिसरातील स्वच्छतेसाठी हालचाल सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, नागरिकांनी भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी ग्राम पंचायतीने नियमित कचरा संकलन व्यवस्था सुरू ठेवावी, कचराकुंड्यांची दुरुस्ती करावी तसेच मंदिर परिसर कायमस्वरूपी स्वच्छ ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# चित्तथरारक सामन्यात भारताने मारली बाजी !

## सेमीफायनल सामन्यात इंग्लंडला हरवत फायनल गाठली...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** टी२० वर्ल्ड कप सेमी फायनल सामन्यामध्ये भारताने इंग्लंडचा ७ धावांनी पराभव केला. शेवटच्या ओव्हरपर्यंत गेलेल्या या सामन्यामध्ये भारताने शेवटी बाजी मारली. पहिल्यांदा फलंदाजी करताना भारताने २५३-७ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंड संघाला २० ओव्हरमध्ये २४६-७ धावांवर रोखले. इंग्लंड संघाचा युवा खेळाडू जेकब बेथल याची १०५ धावांची झुंजार शतकी खेळी व्यर्थ गेली. या विजयासह भारताने आता फायनलमध्ये प्रवेश केला आहे. भारताने केलेल्या सांघिक कामगिरीच्या जोरावर भारताने हा विजय साकार केला.

या सामन्यामध्ये इंग्लंड संघाने शेवटपर्यंत कडवी झुंज दिली होती. मात्र जसप्रीत बुमराह याने १८ व्या ओव्हरमध्ये सामना पूर्णपणे फिरवला. इंग्लंडला त्या ओव्हरमध्ये फक्त ६ धावा दिल्या. त्यानंतर हार्दिक पंड्याने १९ व्या ओव्हरमध्ये ९ धावा देत सामना भारताच्या बाजूने झुकवला होता. भारतासाठी नेहमीप्रमाणे बुमराह संकटमोचक म्हणून उभा राहिला. २०२४ च्या वर्ल्ड कप मध्येही बुमराहने भारताला कमबॅक करून दिले होते. सॅम करन आणि जेकब बेथल मैदानात घट्ट पाय रोवून बसले होते, दोघांनाही बुमराहने मोठा फटका खेळू दिला नाही. या सामन्यात त्याने ४ ओव्हरमध्ये ३३ धावा देत १ विकेट नावावर केली. आजच्या सामन्यामध्ये संजून ८९ धावा केल्या, इतर फलंदाजांनीही आक्रमक खेळी केल्या. पण सामना बुमराहनेच भारताच्या पारड्यात झुकवला. सामना संपल्यावर संजू सॅमसनला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

**सामन्याचा धावता आढावा**

भारताकडून संजू सॅमसन याने सर्वाधिक ८९ धावा करत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला होता. ईशान किशन ३९ धावा, शिवम दुबे ४३ धावा, हार्दिक पंड्या २७ धावा आणि तिलक वर्मा २१ धावा केल्या होत्या. इंग्लंडकडून आदिल राशीद आणि विल जॅक्स यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या होत्या. भारताच्या २५४ धावांचा पाठलाग करताना इंग्लंडकडून जेकब बेथल १०५ धावा आणि विल जॅक्सने ३५ धावा केल्या. मात्र इतर कोणाकडून त्याला संधी मिळाली नाही. सात धावांनी भारताने विजय मिळवला. भारताचा आता फायनलमध्ये न्यूझीलंडसोबत रविवारी सामना होणार आहे.

**(भारत प्लेइंग ११) :** अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (थघ), इशान किशन, सूर्यकुमार यादव उ), तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराह

**(इंग्लंड प्लेइंग ११) :** फिल सॉल्ट, जोस बटलर (थघ), हॅरी ब्रूक (उ), जेकब बेथल, टॉम बँटन, सॅम करन, विल जॅक्स, जेमी ओव्हरटन, लियाम डॉसन, जोफ्रा आर्चर, आदिल रशीद

**वर्ल्ड कप सेमी फायनलमध्ये भारतीय खेळाडूंनी रचले ३ वर्ल्ड रेकॉर्ड**

या सामन्यामध्ये भारताने पहिल्यांदा फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये २५३-७ धावा केल्या. भारताकडून संजू सॅमसन याने सर्वाधिक ८९ धावा केल्या. तिलक वर्मा ४३ धावा आणि ईशान किशन ३९ धावांच्या जोरावर भारताने मोठी धावसंख्या रचली. भारताच्या खेळाडूंनी वर्ल्ड रेकॉर्डची नोंद केली आहे. तीन मोठे भीमपराक्रम भारताने आपल्या नावावर केले आहेत.

भारतीय संघाने आजच्या सामन्यामध्ये नॉक आऊट सामन्यामधील सर्वात मोठा स्कोअर केला आहे. भारताने २५३ धावा केल्या असून याआधी हा विक्रम वेस्ट इंडिजच्या नावावर होता.

आता भारताने नंबर वन वर झेप घेतली आहे. त्यासोबतच एका डावात भारताने सर्वाधिक सिक्स मारण्याचा विक्रम केला आहे. भारताच्या खेळाडूंनी आजच्या सामन्यात तब्बल १९ षटकारांची आतषबाजी केली आहे. तिसरा विक्रम म्हणजे एका वर्ल्ड कपमध्ये २५० धावांचा डोंगर पार करणारा पहिला संघ आहे.

## हर्णे बंदराला सागरी रो-रो सेवेचा थांबा द्यावा – योगेश कदम



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.०५, दापोली (रत्नागिरी) :** मुंबई ते विजयदुर्ग या सागरी रो-रो सेवेला रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील हर्णे बंदर येथे थांबा देण्यात यावा, अशी मागणी राज्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुंबई ते कोकण प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत मुंबई–विजयदुर्ग ही रो-रो सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेमुळे मुंबई आणि कोकण दरम्यान सागरी वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होणार असून प्रवाशांना मोठी सोय होणार आहे.

राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, दापोली तालुक्यातील हर्णे बंदर येथे सध्या जेट्टीचे बांधकाम सुरू असून हे बंदर सागरी वाहतुकीसाठी महत्त्वाचे ठिकाण ठरू शकते. दापोली तालुक्यात रेल्वे मार्गाची सुविधा नसल्याने येथील नागरिकांना मुंबईसह इतर शहरांमध्ये जाण्यासाठी प्रामुख्याने रस्ते किंवा सागरी मार्गावर अवलंबून राहावे लागते.

अशा परिस्थितीत मुंबई–विजयदुर्ग रो-रो सेवेला हर्णे बंदर येथे थांबा दिल्यास दापोली तालुक्यासह परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होईल. तसेच कोकणातून मुंबईकडे जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी सागरी मार्ग अधिक सोयीस्कर ठरेल आणि स्थानिक स्तरावर सागरी वाहतूक व पर्यटनालाही चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर मुंबई–विजयदुर्ग रो-रो सेवेला हर्णे बंदर येथे थांबा देण्याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी योगेश कदम यांनी मंत्री नितेश राणे यांच्याकडे केली आहे.

# पेणमध्ये घरफोडी करणाऱ्या चोरट्यांचा पर्दाफाश !



## दोन गुन्ह्यांची उकल, लाखोंचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०५, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील दोन घरफोडी चोरीच्या घटनांची उकल करण्यात पेण पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश आले आहे. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून तिसरा आरोपी फरार आहे. पोलिसांनी या प्रकरणात सुमारे ३ लाख ४५ हजार रुपयांचा चोरीचा माल हस्तगत केला आहे. या दोन्ही घटनांमध्ये चोरी करणारे आरोपी एकच असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

पहिली घटना पेण शहरातील मँगो होम्स सोसायटीमध्ये घडली होती. येथील रहिवासी विकास विठोबा खामदेकर यांच्या घरी १५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ ते १६ जानेवारी रोजी सकाळी १०.३० या दरम्यान अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्या-चांदीचे सुमारे १ लाख ९५ हजार रुपयांचे दागिने चोरून नेले होते. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात १७ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसतानाही पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे संशयित सुमित संतोष हंकारे याच्या हालचालींवर सुमारे ३५ ते ४० दिवस नजर ठेवून त्याला ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी सांगली जिल्ह्यातून चोरीस गेलेले सर्व सोने-चांदीचे दागिने जप्त केले.दुसरी घटना पाटणोली, कोप्रोली (ता. पेण) येथे घडली होती. फिर्यादी दिनेश मणीराम म्हात्रे यांच्या भावाच्या घराचा कडी-कोयंडा तोडून २० फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८ ते २१ फेब्रुवारी सकाळी ६ या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून सुमारे १ लाख ५० हजार रुपयांची रोख रक्कम चोरी केली होती. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी भिवंडी येथे छापा टाकून आरोपी शमसूद्दहा रईस कुरेशी (वय ३६) याला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीत सलीम उर्फ अहमद फिरोज अन्सारी (वय ३०) आणि मोहम्मद शाहिद अल्लाउद्दीन खान हे साथीदार असल्याचे समोर आले.

त्यानंतर सलीम अन्सारी याला मुंब्रा येथून अटक करण्यात आली. या दोन्ही आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली गाडी, हत्यार आणि चोरीस गेलेल्या रकमेपैकी काही रक्कम जप्त करण्यात आली असून मुख्य आरोपी मोहम्मद शाहिद खान हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

## लाल रेतीची अवैध वाहतूक करणारा हायवा जप्त



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०५, कुंडलवाडी (नांदेड) :** येथील पोलिसांनी अवैध लाल रेतीची वाहतूक करणाऱ्या हायवा वाहनावर कारवाई करत वाहन जप्त केले आहे. ही कारवाई दिनांक ५ मार्च रोजी मध्यरात्री ३:४५ वाजण्याच्या सुमारास कुंडलवाडी-धर्माबाद रोडवरील एम.एस.ई.बी. कार्यालयासमोर करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टाटा कंपनीचा हायवा (क्रमांक एमएच २६ बीई १७७२) हा वाहन चालक अवैधरित्या लाल रेतीची वाहतूक करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. तपासादरम्यान वाहनात सुमारे ६ ब्रास लाल रेती आढळून आली. संबंधित चालकाकडे रेती वाहतुकीसाठी आवश्यक कागदपत्रे नसल्याने वाहन ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी चालक सदाशिव माधवराव गोरठकर वय ४२ राहणार सायाळ ता भोकर आणि वाहन मालकाविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३०३ (२),३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेल्या वाहन व रेतीची एकूण किंमत अंदाजे २५ लाख ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल रघुवीर चव्हाण, पिराजी मेडेकर,सुनील दस्तके, होमगार्ड सुनील रामपुरे यांनी केली आहे.

# स्थायी समिती निवडीवरुन कॉंग्रेसमध्ये उभी फूट ; नगरसेवकांचा तडकाफडकी सभात्याग



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिका महापौर निवडीच्या जवळपास महिनाभरानंतर स्थायी समिती सदस्य निवडीसाठी ५ मार्चला मुहूर्त मिळाला, यासाठी मनपा सभागृहात घेण्यात आलेल्या विशेष सभेत चांगलाच गोंधळ उडाला. कॉंग्रेस गटनेत्याने आपल्या मर्जीतील नगरसेवकांचे नावे पुढे केल्याने कॉंग्रेस नगरसेवकांनी सभात्याग केला. स्थायी समिती सदस्यांसाठी एकूण १६ नगरसेवकांची निवड करण्यात आली.

सदस्य निवडीकरीता कॉंग्रेस व भाजपच्या गटनेत्याने नगरसेवकांची नावे दिल्याने दोन्ही पक्षात गटबाजीचा संघर्ष पुन्हा उसळला. कॉंग्रेस गटनेते राजेश अडूर यांनी स्वत:सह वसंत राजेश्वरराव देशमुख, चंदा मनोज वैरागडे, संजीवनी राजु वासेकर, सचिन विनोद कत्याल, खान साफिया तवंगर, विनोद हरिश्चंद्र लभाने यांची नावे दिल्याने धानोरकर गटातील नगरसेवक नाराज झाले, त्यांना या समितीमध्ये स्थान न मिळाल्याने नगरसेवकांनी सभात्याग केला. यावेळी नगरसेवक सुरेंद्र अडबाले यांनी प्रतिक्रिया दिली की, आमच्या नेत्यांनी स्थायी समितीकरीता नावे दिली होती. मात्र, गटनेता अडूर यांनी आपली मनमर्जी चालवित आपल्याच समर्थकांना सदस्यपद दिले. या घडामोडीमुळे धानोरकर- वडेट्टीवार गटबाजीला पुन्हा खतपाणी मिळाले.

भाजपकडून सुभाष दिनकर कासनगोट्टूवार, संजय नारायण कंचर्लावार, पुष्पा संजय उराडे, सारिका सचिन संदूरकर, प्रज्वलंत प्रमोद कडू, सविता प्रलय सरकार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. तसेच शिवसेना (उबाठा) वंचित गटाकडून मनस्वी गिर्हे व श्रुती घटे, महानगर आघाडी गट तर्फे प्रदिप शंकर देशमुख यांच्या गळ्यात सदस्यपदाची माळ टाकण्यात आली.

भाजप नगरसेवकांच्या सदस्य पदावरुन मुनगंटीवार समर्थक नगरसेवक रवि लोणकर यांना स्थान न मिळाल्याने ते चांगलेच नाराज झाले. भाजपच्या यादीत जोरगेवार गटाचे ४ तर मुनगंटीवार गटाचे २ सदस्यांची निवड करण्यात आली. यावेळी महापौर संगिता खांडेकर, उपमहापौर प्रशांत दानव व आयुक्त अकुनूरी नरेश उपस्थित होते.

अक्षराज



# आखातातील युद्धाची जगाला झळ



इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ला चढवून मध्यपूर्वेत युद्धाला तोंड फोडले. आपल्यावर हल्ला होईल याची कल्पना इराणला होतीच. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जूनमध्येच इराणला तशी धमकी दिली होती. तरीही इराणचे नेतृत्व याबाबतीत गाफील राहले. इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ला करण्याची फुलप्रुफ योजना बनवली होती.

या योजनेची इराणच्या गुप्तचर यंत्रणेला कुठलीही माहिती मिळाली नाही. हे इराणच्या गुप्तचर यंत्रणेचे अपयशच म्हणावे लागेल. त्याची मोठी किंमत त्यांना मोजावी लागली. इराणचे सर्वोच्च नेते आयातूला खामेनी आणि त्यांचे अनेक विश्वासू लष्करी अधिकारी एकाच वेळी मारले गेले. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण आपल्याला सहज शरण येईल असे अमेरिकेला वाटले पण झाले उलटेच. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण पेटून उठला. अमेरिकेला शरण जाण्यापेक्षा त्यांनी स्वाभिमानाने त्यांच्याशी लढण्याचे ठरवले. इस्त्रायल आणि अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्याचे ठरवून त्यांनी इस्त्रायलच्या प्रमुख शहरांना लक्ष केले इतकेच नाही तर आखातात ज्या ज्या देशात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत तिथे हल्ले सुरू केले.

त्यामुळे युद्धाची व्याप्ती वाढली. अमेरिका आणि इस्त्रायलनेही इराणच्या तेहरानसह प्रमुख शहरांना लक्ष करून क्षेपणास्त्रांचा मारा सुरू ठेवला तरीही इराणने माघार घेतली नाही. खाम ेनी यांच्या मृत्यूनंतर इराण शरण येईल आणि आपला सहज विजय होईल अशा आविर्भावात असलेल्या इराण आणि इस्त्रायलला आठवडा होत आला तरी हे युद्ध थांबवता आले नाही उलट युद्धाची व्याप्ती वाढली. ती इतकी वाढली की खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांना हे युद्ध आणखी तीन ते चार आठवडे चालेल असे सांगावे लागेल. जर हे युद्ध आणखी तीन ते चार आठवडे चालले तर त्याची झळ केवळ या तीन देशांना किंवा आखातातील देशांनाच बसेल असे नाही तर संपूर्ण जगाला याची झळ बसेल. त्याची सुरुवातही झाली आहे. इराणने इंधन वाहू जहाजांसाठी हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. या सामुद्रधुनीतून फक्त चीनच्या जहाजांना जाण्यास परवानगी असल्याचे इराणने म्हटले आहे इतर देशांच्या जहाजांनी जर या सामुद्रधुनीत प्रवेश केला तर तर जहाजांवर हल्ला करेल अशी धमकी इराणने दिली आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी इंधन वाहतूक करणाऱ्या जहाजांसाठी खूप महत्वाची सामुद्रधुनी आहे. आखाती देशातून इतर देशांना होणारा तेलपुरवठा याच समुद्रधुनीतून होतो ते जर ही सामुद्रधुनी बंद झाली तर संपूर्ण जगात इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण होईल परिणामी संपूर्ण जगावर मोठे संकट कोसळेल. हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून दररोज दोन कोटी बॅरल इंधनाची वाहतूक केली जाते. तसेच कतार आणि यूएइ या अरब देशातून नैसर्गिक वायूची निर्यात देखील केली जाते. इराणच्या या कारवाईमुळे या सागरी क्षेत्रातून होणारी इंधनाची वाहतूक खंडित झाली असून जागतिक पुरवठा साखळी संकटात सापडली आहे. गेल्या आठवड्यात आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर ७२ डॉलर इतके होते आता ते ८१ डॉलर पर्यंत पोहचले सर जर हे युद्ध आणखी काही दिवस असेच सुरू राहिले तर आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर प्रति बॅरल २०० डॉलरवर पोहोचतील असे जाणकार सांगत आहेत. याचाच अर्थ हे युद्ध जरी आखातात सुरू असले तरी त्याची झळ संपूर्ण जगाला बसू शकते. तेलाचे दर वाढले की महागाई वाढते हे असे अर्थशास्त्र सांगते त्यामुळे भविष्यात महागाईचा आगडोंब उसळू शकतो याचा फटका सर्वसामान्य जनतेलाच बसणार आहे. त्यामुळे हे युद्ध लवकरात लवकर संपणे हेच जगाच्या हिताचे आहे. हे युद्ध लवकर संपावे यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने प्रयत्न करायला हवेत. युद्ध थांबवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने हस्तक्षेप करायला हवा. संयुक्त राष्ट्रसंघाने शांतीसेना पाठवून हे युद्ध रोखायला हवे. हे युद्ध जर वेळीच थांबले नाही तर कदाचित जग तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले जाईल आणि त्यात संपूर्ण जग होरपळून निघेल.

**- श्याम ठाणेदार**

# छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण नीती



छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी मराठेशाहीची मुहूर्तमेढ रोवली. त्याकामी महाराजांना जसे अनेक निष्ठावान मावळ्यांचे सहकार्य लाभले, तसेच भौगोलिक आणि पर्यावरणीय घटकांचेही सहकार्य मिळाले. त्यांनी पर्यावरणीय घटकांचा मराठेशाहीच्या उदय व विकासात उपयोग करून घेतला. त्यांच्या पर्यावरण नीतीमध्ये गडकोट, गनिमी कावा, आरमार उभारणी, जलव्यवस्थापन, वनसंपत्ती संवर्धन, दुष्काळ निर्मूलन अशा बाबींविषयी चर्चा करता येते. शिवरायांनी सह्याद्रीच्या डोंगररांगांवर तसेच कोकण किनारपट्टीवर अभेद्य असे दुर्ग निर्माण केले व जलदुर्ग बांधताना पर्यावरणाचा सखोल अभ्यास केलेला दिसतो.

सिंधुदुर्ग या जलदुर्गाचे बांधकाम पाहिल्यावर शिवराय हे श्रेष्ठ दर्जाचे पर्यावरण तज्ज्ञ होते हे सिद्ध होते. १६६४ मध्ये कुरटे बेटावर शिवरायांनी सिंधुदुर्ग बांधून घेतला. तेथील पाण्यात आडवे तिडवे छुपे खडक असल्याने बेटाभोवती तीन कोसपर्यंत मोठ्या नौका येणे मुश्कील असे. पर्यावरणाच्या ज्ञानामुळे शिवरायांनी येथेच गड बांधला. या गडावर चोहोबाजूंनी खारे पाणी असताना तेथील दही बाव, साखर बाव व दूध बाव या तीन गोड्या पाण्याच्या विहिरी आहेत. पर्यावरणपूरक शौचालय बांधण्याचा आग्रह आज सरकार करते आहे, तसे ४० शौचकूप या जलदुर्गावर बांधलेले आहेत. कोकणातील विजयदुर्ग जिंकून घेतल्यावर तेथेही शिवरायांनी दुर्गविज्ञान वापरले. गडाच्या पश्चिमोत्तर बाजूच्या समुद्राच्या तळात अंदाजे ४०० मीटर लांबीची तटबंदी मरीन आर्किऑलॉजी क्लबने शोधून काढली आहे. या तटबंदीचा वापर गडाच्या संरक्षणासाठी केला गेला. शिवकाळात अनेक जहाजे या बाजूने येताना रसातळाला गेल्याची नोंद इतिहासात आहे. ही जहाजे कशास धडकून फुटतात याचे त्याकाळी पोर्तुगीज व इंग्रजांना कोडे पडत असे. 'ज्यांचे आरमार त्यांचा समुद्र' या तत्त्वाप्रमाणे शिवरायांनी सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, रत्नागिरी येथील बंदरात जहाज बांधणीचे कारखाने व गोदामे उभारली.

सागरीमार्गे शत्रूच्या घुसखोरीस प्रतिबंध करून किनारपट्टीवरील जनतेला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला. पर्यावरणाचे, भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान असल्याशिवाय हे सर्व करणे शक्य नव्हते. मराठेशाहीच्या विस्तारासाठी वापरलेले 'गनिमी कावा' हे युद्धतंत्र शिवरायांनी उपलब्ध पर्यावरणाचा वापर करूनच विकसित केले होते. सह्याद्रीतील घाटम ार्गाच्या परिस्थितीविषयी फेरीस्ता लिहितो की, 'या घाटातील वाटा इतक्या तोकड्या होत्या, की त्यांची तुलना केसाच्या कुरळेपणाशी केली तरी बरोबरी होणार नाही. या अरण्यात सूर्याचा कवडसाही पडायचा नाही.' या सर्व बाबी गनिमी काव्याला अनुकूल होत्या. त्यांचा शिवरायांनी आपल्या पर्यावरण नीतीत योग्य वापर करून घेतला. आदिलशहा सरदार अफजलखान याचा १० नोव्हें. १६५९ रोजी प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या घनदाट जंगलात केलेला पराभव, तसेच २ फेब्रु. १६६१ रोजी मुघल अधिकारी कारतलब खान याच्या तीस हजार फौजेचा उंबरखिंड येथे केलेला पराभव ही गनिमी कावा युद्धतंत्राची उदाहरणे म्हणून सांगता येतात. शिवकाळात दगडधोंड्याचा वापर करूनही शत्रूला नामोहरम करण्याचा प्रयत्न केला जात असे.

आजच्या सारखीच दुष्काळी परिस्थिती शिवकाळातही होती. १६३० तसेच १६५० या वर्षी दुष्काळ पडल्याची नोंद आढळते. शिवरायांनी हवामानाचा लहरीपणा लक्षात घेऊन जलव्यवस्थापन करण्यावर भर दिला. रामचंद्रपंत अमात्य यांच्या मार्फत आज्ञापत्रात शिवराय आज्ञा करतात की, 'गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि ते स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी टाकी पर्जन्य काळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल अशी मजबूत बांधावीत. गडाचे पाणी बहूत जतन राखावे.' पाणी बचतीचाही संदेश शिवराय देतात. शिवरायांनी वनसंवर्धनालाही खूप महत्त्व दिले होते. गडावर आंबा, वड, नारळ, साग, शिसव अशी झाडे लावली जात होती. रायगडाच्या पायथ्याला शिवरायांची मोठी आमराई असल्याचा उल्लेख मिळतो. त्यांनी आपल्या एका आज्ञापत्रात वृक्षतोड थांबविण्याचा संदेश देऊन संत तुकाराम म हाराजांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या वचनाचा प्रत्यक्ष जीवनात अवलंब केल्याचे आढळून येते. आजच्या काळात शिवकालीन पर्यावरण नीतीचे अनुकरण केले, तर छत्रपती शिवाजी महाराजांना खऱ्या अर्थाने ते अभिवादन ठरेल.

**(साभार – सनातन प्रभात)**

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## जल प्रेमी राजे

जल संपदा महत्व
शिवबाअसे जाणुन
जल संवर्धनासाठी
करी योजना म्हणून

किल्ले बांधणेआधी
बावडी घेती खणून
नाले ओढे ते संपन्न
दुरुन पाणी आणून

अन्नधान्य पाणीसाठे
साठवले रे भरभरुन
प्रतापगडा तो वेढा
सहजपाडला हाणून

झाडी झुडपे जंगले
ठेवला वारसा जपून
इतिहास देतो साक्ष
कर्तृत्व गेले व्यापून

रयते कुणीन उपाशी
झोपे सुग्रास खाऊन
स्वराज्य योजनाबध्द
दुष्काळ पळे भिऊन

बळीराजा खरासुखी
स्वराज्याघास भरवून
असाराजा होणे नाही
सांगे जगाला मिरवून

राजेंच्या मनी निर्झर
जनप्रेम वाहे ओसंडून
शिवरायजयघोष गर्जे
क्षितीजपार ओलांडून

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# दादांच्या विमान अपघाताचे गूढ हवेत गिरट्या घालतंय..?




महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यूला एक महिना होऊन गेला आहे. मात्र, आरोपांची उड्डाणे काही थांबत नाहीत.अजित पवार यांचे पुतणे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार असलेले रोहित पवार या संदर्भात अनेक आरोप करत आहेत आणि त्यांची उत्तरे सरकार देत नाही. केवळ चौकशी सुरु आहे.

तपास यंत्रणा तपास करत आहेत, अशी गुळमुळीत उत्तरे दिली जात असल्याने कुठे पाणी मुरतंय का, अशी शंका आता सर्वांना येत आहे. २८ जानेवारी रोजी सकाळी पावणेनऊच्या सुमारास अजित पवार यांचे विमान बारामती विमानतळावर उतरत असताना कोसळले. तेव्हापासून यामागे घातपात असल्याची शंका उपस्थित केली जात आहे. रोहित पवारांनी याबाबत अनेकदा प्रेझेंटेशन करत अनेक मुद्दे मांडले आहेत. एवढेच नाही तर त्यांनी या संपूर्ण प्रकरणात पोलिसांत तक्रार करण्यासाठीही प्रयत्न केले होते. मात्र, पोलिसांनी त्यांची तक्रार घेण्यास नकार दिला. यावरून हे प्रकरण दिसते तितके सोपे नसल्याचे सगळ्यांच्या लक्षात आले आहे. आता तर एक गंभीर चूक समोर आली आहे. विमान अपघात चौकशी विभाग (एएआयबी) ने एक महिन्यानंतर चौकशीचा पहिला प्राथमिक अहवाल दिला. या अहवालात अनेक चुका आढळून आल्याने त्यांच्या चौकशीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यातील पहिली चूक म्हणजे विमान झाडाला धडकून पडल्याचा अहवाल आहे. याला रोहित पवार आणि छगन भुजबळ यांनीही आक्षेप घेतला आहे.

कोणत्या झाडाला धडकून विमान कोसळले, असा प्रतिप्रश्न रोहित पवार यांनी केला आहे. कारण झुडुपांची उंची आणि विमानाची उंची यांची तुलना करता येत नाही, असे सांगत त्यांनी एएआयबीचा हा मुद्दा खोडून काढला आहे. या अहवालात आणखी एक चूक आढळल्याचे रोहित पवार यांनी निदर्शनास आणून दिले आहे. यात बारामतीचा उल्लेख जिल्हा आणि बारामती महापालिका असल्याचे नमूद केले आहे. यावरून एएआयबी तपासाच्या बाबतीत खरोखरच गंभीर आहे का, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. रोहित पवार यांच्या आरोपानंतर एक महिन्याने डीजीसीएने व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीच्या विमानांच्या उड्डानावर बंदी घातली. म्हणजेच त्यांना नक्कीच काही त्रुटी आढळल्या आहेत. ज्याप्रमाणे रोहित पवार आरोप करत आहेत तो घाव कुणाच्या तरी नक्कीच वर्मी लागत असेल अन्यथा हे आरोप खोटे आहेत, असे एएआयबी किंवा डीजीसीएने स्पष्ट केले असते. या आरोपांवर कळस म्हणजे रोहित पवार यांनी आणखी एक गंभीर आरोप केला आहे.

याच व्हीएसआर कंपनीच्या विमानाने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दावोसला जात असताना नियमांचे उल्लंघन केले म्हणून विमान पाडण्याचा इशारा इराण आणि इराकने दिला होता. परवानगी न घेता विमान दुसऱ्या देशाच्या हद्दीत घुसत असेल तर त्या देशांचा तो अधिकार आहे. मात्र, अशी परवानगी न घेणे, ही संबंधित कंपनीची घोडचूक आहे. मुख्यमंत्री आणि राज्याचे अधिकारी या विम ानात होते. व्हीएसआर कंपनीचा कारभार किती बेमुर्वतपणे सुरू आहे, याचा हा उत्तम नमुना आहे.ही घटना जानेवारी २०२३ मधील आहे. रोहित पवार यांच्या या आरोपाने राज्यातच नव्हे तर देशात खळबळ उडाली आहे. तत्पूर्वी तीन दिवसांपूर्वी जय अजित पवार यांनी ट्वीट करत खळबळ उडवून दिली होती. याच व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीच्या विमानात कंपनीचा मालक कॉकपिटमधील पायलटच्या खुर्चीत खुशाल झोपलेला होता. ही केवढी गंभीर बाब आहे. मुळात पायलटच्या खुर्चीत बसून कुणी आराम ात कसा झोपू शकतो ? एवढे असूनही या कंपनीच्या सर्व विमानांवर डीजीसीएने अजून संपूर्ण कारवाई केलेली नाही. डीजीसीएने केवळ व्हीएसआर कंपनीची काही विमाने जमिनीवर उतरवली आहेत. या कंपनीवर एवढे आरोपही होऊनही त्यांच्यावर अजून म्हणावी तशी कठोर कारवाई झालेली नाही. त्यामुळे व्हीएसआर कंपनीची कोण पाठराखण करत आहे, असा सवाल रोहित पवार करत आहेत. रोहित पवार यांनी याआधी तीन पत्रकार परिषदा घेऊन वेगवेगळे आरोप केले होते. आता चौथ्या पत्रकार परिषदेत त्यांनी अपघातापूर्वी विम ानतळाची रेकी झाली होती, असा आरोप करत याचा गुन्हेगारी पद्धतीने तपास केला पाहिजे, अशी मागणी केली.

एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात रोहित पवार वारंवार प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यातून अनेक शंकांना वाव मिळत आहे. शिवाय त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. त्याला अजून सरकारने होकार दिलेला नाही. एकूणच अजित पवार यांच्या विमान अपघाताचे गूढ दिवसेंदिवस वाढत आहे आणि सोबत व्हीएसआर कंपनीच्या विश्वासार्हतेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळेच या सर्व शंकांना कधी पूर्णविराम मिळेल आणि अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूवरील सावट कधी हटणार, हे महत्त्वाचे प्रश्न अनुत्तार अनुत्तरित आहेत. या प्रकरणाला जी विविध वळणे मिळत आहेत ते पाहता ही चौकशी आहे की चौकशीचा फार्स, असे अनेकांच्या मनात आल्याशिवाय राहत नाही. दादांच्या विमान अपघाताचे गूढ हवेत गिरट्या घालतंय.

## सुखेड जि.प.शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०५, खंडाळा (सातारा) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,सुखेड ता. खंडाळा येथे नुकतेच वार्षिक स्नेहसंमेलन २०२५–२६ मोठ्या उत्साहात पार पडले. या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे उद्घाटन सातारा जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्य ऋषिकेश धायगुडे पाटील व पंचायत समिती सदस्या वंदना रमेश धायगुडे पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी सुखेड गावचे सरपंच रविंद्र धायगुडे, उपसरपंच वैशाली धायगुडे, पोलीस पाटील रमेश धायगुडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप दादा धायगुडे, उपाध्यक्ष प्रियंका धायगुडे, मा. सरपंच भिमराव धायगुडे, संतोष धायगुडे तसेच या कार्यक्रमासाठी डॉ. नितीन सावंत,गणेश धायगुडे, महेश शेळके व शरद कोकरे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.


मुख्याध्यापक बाळासाहेब सोळसकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली खुडे सर, रासकर सर, वाघोले सर, थोरात मॅडम, ननावरे मॅडम व धायगुडे मॅडम यांनी कार्यक्रम बसवण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. सर्वांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्य,समूहगीत, नाटिका व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या स्नेहसंमेलनातून एकूण ₹४६,००० इतका शैक्षणिक उठाव जमा झाला असून हा निधी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी वापरण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.उपस्थित सर्वांचे मुख्याध्यापक सोळस्कर यांनी आभार व्यक्त केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कलासाधना सामाजिक संस्था नवी मुंबई आयोजित राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धा २०२६ निकाल जाहीर




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, नवी मुंबई :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छ.शिवाजी महाराज यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये राज्यभरातील कला शिक्षकांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदविला. सर्व सहभागी कला शिक्षकांनी फलक लेखनाचे कार्य अत्यंत कल्पक, सुबक आणि उत्कृष्ट पद्धतीने सादर केलेले होते. प्रत्येक फलकामधील विचारांची मांडणी, अक्षररचना, रंगसंगती आणि सादरीकरणाची गुणवत्ता पाहून आयोजक व परीक्षक यांना खूप समाधान वाटले. अनेक फलकांमध्ये शिवचरित्रातील पराक्रम, नेतृत्वगुण, स्वराज्याची संकल्पना आणि प्रेरणादायी संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडलेले होते.

**फलक लेखन स्पर्धेचा निकाल अध्यक्ष मेघा महाजन यांनी पुढील प्रमाणे जाहीर केला**

**प्रथम क्रमांक :** राहुल रोहिदास बागुल

**द्वितीय क्रमांक :** ज्ञानेश्वर भीमराव सोनवणे/अविनाश प्रभाकर कांबळे

**तृतीय क्रमांक :** राजन पवार

**उत्तेजनार्थ क्रमांक :** अमरसिंग टेंबऱ्या वसावे, परशुराम हरिदास घाडगे, चित्रसेन वासुदेव पागधरे, अतुल गणेशराव अस्वार, सिद्धेश सुधाकर कानसे, सिद्धार्थ विजयकुमार कांबळे,सिराज हैदर तडवी, राजेंद्र कारभारी दिघे, काशिनाथ अर्जुन गावित, दत्ताराम रामचंद्र कोकरे, दिनेश नामदेव सूर्यवंशी, बाबुलाल मंगतू जाधव, हर्षल कृष्णकांत जोशी. संतोष मधुकर मुंढरे, अजय रामराव जिरापुरे, शंकर रामचंद्र सोनावणे, अर्जुन सरस्वती धाकु माचिवले, मनोज राजु भिल, राहुल रमेश राठोड, दत्तात्रय हिलाल बागुल, दाभाडे सुनिल आनंदा, सरिता योगेश कोडापे, नुसरत जहाँ रियाजोद्दीन, प्रियांका राजेन्द्र जठार, प्रमिला आखरे, या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. गजानन शेपाळ, मनोहर बाविस्कर, राधिका कुसुरकर वाघ,नितीन चव्हाण यांनी काम पहिले. सर्व विजय स्पर्धकांना १५ मार्च २०२६ रोजी कामोठे नवी मुंबई येथे सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे, असे अध्यक्ष सौ. मेघा महाजन यांनी यावेळी बोलताना सांगितले, सर्व विजय स्पर्धकांना खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी खुप साऱ्या शुभेच्छा!

## कचरा जाळण्याने नवी मुंबईतील १४ गावात प्रदूषण; नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, नागांव (ठाणे) :** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील निघू, नागाव आणि नारिवली भागात रात्री औद्योगिक आणि रासायनिक कचरा टाकून तो जाळण्याचा प्रकार पुन्हा सुरू झाला आहे. या प्रक्रियेमुळे परिसरात धूर, दुर्गंधी आणि प्रदूषण वाढले असून श्वास घेण्यास, डोळ्यांची जळजळ आणि इतर आरोग्याशी संबंधित समस्या वाढत असल्याचे सांगत स्थानिकांनी तक्रार केली आहे.

दररोज रात्री सुमारे ११ ते पहाटे २ या वेळेत हा कचरा जाळला जात असल्याचे नागरिकांनी सांगितले. यापूर्वी प्रशासनाने दोन ते तीन वेळा कारवाई केली असली तरी परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही, त्यामुळे नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे.

स्थानिकांच्या मते, या वाढत्या प्रदूषणावर संबंधित विभागांनी गंभीर लक्ष देणे आवश्यक आहे. यावर ठोस व योग्य कारवाई न झाल्यास, नागरिकांनी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

## महाराजस्व शिबिरातून नागरीकाने समाधान शिबिराचा लाभ घ्या- तहसीलदार विष्णू बुटे

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०५, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यामधील सर्व महसूल मंडळात श्री. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात विविध प्रकारचे महसूली दाखले, पुरवठा कार्यालयाशी संबंधित दाखले, इतर विभागांशी संबंधित योजना व दाखले यांची सुविधा तात्काळ पुरवली जाणार आहे. तेव्हा तालुक्यातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे व मंद्रूपचे तहसीलदार विष्णु बुटे यांनी केले आहे. सरकारी कामात गतीमानता आणण्यासाठी व सरकारी योजना प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत

| शिबिराचे ठिकाण व दिनांक (दक्षिण तहसील अंतर्गत) | शिबिराचे ठिकाण व दिनांक (मंद्रूप तहसील अंतर्गत) |
|---|---|
| बोरामणी - ७ मार्च | माळकवठे - ७ मार्च |
| होटगी - १४ मार्च | मंद्रूप - १४ मार्च |
| वळसंग - १० एप्रिल | औराद - १० एप्रिल |
| मुस्ती - १७ एप्रिल | विंचूर - १७ एप्रिल |
| - | निंबर्गी - ८ मे |
| - | टाकळी - १५ मे |

पोहोचविण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ७ मार्चपासून या अभियानाला सुरुवात होणार आहे. मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयांतर्गत मंद्रूप, निंबर्गी, विंचूर व औराद मंडलमध्ये प्रत्येकी दोन गावात सहा शिबिरे होणार आहेत. तर दक्षिण तहसील कार्यालयांतर्गत वळसंग, बोरामणी, मुस्ती व होटगी या गावात चार शिबिर होणार आहेत. तरी लाभार्थ्यांनी या समाधान शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# एसटीची शिवनेरी आता मुंबई-पुण्याच्या पुढे राज्यभर धावणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०५, मुंबई :** मुंबई-पुणे महामार्गाची 'राणी' म्हणून ओळख मिळवलेल्या एसटीच्या अत्याधुनिक, आरामदायी आणि सुरक्षित 'शिवनेरी' बस सेवेची झेप आता राज्यभर घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच मुंबई-पुणे मार्गाच्या पलीकडे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांदरम्यान शिवनेरी धावणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

२००२ मध्ये सुरू झालेल्या शिवनेरी सेवेने वक्तशीरपणा, उत्कृष्ट आसनव्यवस्था आणि सुरक्षित प्रवास या गुणवैशिष्ट्यांमुळे उच्च मध्यमवर्गीय प्रवाशांचा विश्वास जिंकला. इतर बससेवेपेक्षा तिकीटदर थोडे अधिक असतानाही सातत्याने मिळणाऱ्या उत्तम प्रतिसादामुळे ही सेवा सुरुवातीपासूनच नफ्यात आहे, असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

राज्यभर विस्तारासाठी २०० नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त व्होल्व्हो बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होताच, मुंबई-पुणेप्रमाणेच इतर महत्त्वाच्या शहरांदरम्यानही शिवनेरी सेवा सुरू होईल.

**प्रस्तावित मार्गांमध्ये,**

नाशिक-पुणे, नाशिक-छत्रपती संभाजीनगर, नाशिक-जळगाव-धुळे, पुणे-कोल्हापूर, पुणे-सांगली, पुणे-सोलापूर, नागपूर-चंद्रपूर, नागपूर-अमरावती-अकोला अशा प्रमुख शहरांचा समावेश आहे. त्यामुळे राज्याच्या विविध भागांतील प्रवाशांना आलिशान, सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

**ई-बस सेवेलाही उत्तम प्रतिसाद**

सध्या दादर-स्वारगेट, दादर-शिवाजीनगर, बोरीवली-स्वारगेट, बोरीवली-शिवाजीनगर, ठाणे-स्वारगेट आणि ठाणे-शिवाजीनगर या मार्गांवर पर्यावरणपूरक ई-शिवनेरी बस सेवा सुरू असून प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

**ज्येष्ठ व महिलांसाठी सवलती**




महिला प्रवाशांना तसेच ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना तिकीटदरात ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना शिवनेरी प्रवास पूर्णपणे विनामूल्य आहे. त्यामुळे नव्या मार्गांवरही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

**३० 'स्लिपर शिवनेरी'ची भर**

नवीन २०० बसेसमध्ये ३० शयनयान (स्लिपर) बसेसचा समावेश असेल. सध्या ज्या मार्गांवर विना-वातानुकूलित शयनयान बससेवा आहे, त्या ठिकाणी 'स्लिपर शिवनेरी' सुरू करून प्रवासी सेवेला अधिक उन्नत रूप दिले जाणार आहे. आरामदायी बेड-कोच सुविधा, सुरक्षितता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे दीर्घ पल्ल्याच्या प्रवासात प्रवाशांना नव्या अनुभवाची हमी मिळणार आहे. 'शिवनेरी'चा हा विस्तार म्हणजे केवळ बससेवेची वाढ नव्हे, तर महाराष्ट्राच्या प्रगत आणि गतिमान प्रवाससंस्कृतीची नवी दिशा आहे.असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांतील साहित्य खरेदीत घोटाळ्याचा संशय

## ईओडब्ल्यूच्या तपासात वीरा स्पोर्ट्स,अजिंक्य सप्लायर्स केंद्रस्थानी

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांसाठी खेळाडूंना देण्यात येणाऱ्या क्रीडा साहित्य खरेदीत मोठ्या गैरव्यवहाराचा संशय व्यक्त होत असून पुणे आर्थिक गुन्हे शाखेच्या (EOW) तपासात मुंबईतील वीरा स्पोर्ट्स आणि पुण्यातील अजिंक्य सप्लायर्स या संस्थांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आली आहे.फुगवलेल्या बिलांद्वारे सरकारी निधी वळविण्यात आल्याची शक्यता तपास यंत्रणा पडताळून पाहत आहे.**

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०५, मुंबई :** २०२२,२०२३ आणि २०२५ या वर्षांतील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांसाठी खेळाडूंच्या क्रीडा साहित्य खरेदीत अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त होत असून या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

तपासादरम्यान मुंबईतील वीरा स्पोर्ट्स आणि पुण्यातील दत्तवाडी येथील अजिंक्य सप्लायर्स या संस्थांची महत्त्वाची भूमिका असल्याचे समोर येत आहे.

तपास अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार,वीरा स्पोर्ट्स या कंपनीने गाझियाबाद येथील एक्सोटिका एलियन प्रा.लि.या कंपनीकडून स्थानिक पातळीवर तयार केलेले ट्रॅकसूट सुमारे १,२०० रुपयांना खरेदी केल्याचे आढळून आले आहे.मात्र महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या नोंदींमध्ये हेच ट्रॅकसूट अजिंक्य सप्लायर्सकडून प्रत्येकी २,५०० रुपयांना खरेदी केल्याचे दाखवण्यात आले आहे. याशिवाय या ट्रॅकसूटना नामांकित आदिदास ब्रँडचे उत्पादन असल्याचे दाखवत सरकारकडे बिल सादर करण्यात आल्याचा आरोप असून प्रत्यक्षात ते स्थानिक किंवा बिनब्रँडचे असल्याची शक्यता तपासात व्यक्त केली जात आहे.

आर्थिक गुन्हे शाखा सध्या फुगवलेल्या किंमतीला आधार देण्यासाठी बनावट बिले आणि पावत्या तयार करण्यात आल्या का,याचीही चौकशी करण्यात येत आहे.तसेच ट्रॅकसूटपुरतेच नव्हे तर ब्लेझर, शूज, टी-शर्ट, टर्किश टॉवेल आणि किट बॅग यांच्या खरेदीतही अशाच प्रकारच्या विसंगती असल्याचा संशय तपासात व्यक्त करण्यात आला आहे.तपासादरम्यान गैरव्यवहारातून मिळालेला पैसा काही क्रीडा संस्था किंवा नामदेव शिरगावकर यांच्या निकटवर्तीयांच्या व्यवसायांमार्फत वळवण्यात आल्याची शक्यता पोलिस तपासत आहेत. दरम्यान गुजरात आणि गोवा येथे झालेल्या स्पर्धांचे ऑडिट सादर केल्याचा दावा करण्यात आला असला,तरी गुजरातच्या ऑडिट अहवालात मूळ पुरवठादारांच्या पावत्या आणि बँक व्यवहारांची कागदपत्रे नसल्याचे आर्थिक गुन्हे शाखेच्या निदर्शनास आले आहे.

या प्रकरणाचा तपास सुरू असून पुढील काळात आणखी माहिती समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.

# वाहतुक नियमांचा भंग करणाऱ्यांचा उतरवला रंग ; १६८१ जणांवर वाहतुक पोलिसांची कारवाई

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, ठाणे :** ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील पाच परिमंडळात होळी आणि धूलिवंदनाच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहर वाहतुक शाखेने वाहतुक नियम ांचा भंग करणाऱ्या १ हजार ६८१ जणांवर कारवाई केली. पोलिसांच्या नाकाबंदीत १९६ मद्यपी चालक तावडीत सापडले. यासह विनाहेल्मेट ८३६ फ्रंट सीट २२७ विरुद्ध दिशेने येणारे १४ आणि ४०८ ट्रीपल सीट दुचाकीस्वारांवर वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त पंकज शिरसाट यांनी दिली.

ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह पोलीस



आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या निर्देशानुसार होळी व धुळवडीच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात वाहतूक विभागातील ४५० पोलिस अधिकारी आणि कर्मचारी नाकाबंदीसाठी तैनात केले होते. होळी - धूलिवंदन कालावधीत मद्य प्राशन करून किंवा नशा करून वाहन चालविणार्या चालकांवर कारवाई करण्याची व्यूहरचना वाहतूक विभागाने केली होती. पाच परिमंडळात ठिकठिकाणी नाकाबंदी लावण्यात आलेली होती. या नाकाबंदीत नशापान किंवा मद्यप्राशन करून दुचाकी, चारचाकी वाहने चालविणाऱ्या तब्बल १९६ जणांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला.

तर ८३६ विनाहेल्मेट दुचाकी चालवणारे,४०८ ट्रीपल सीट दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. ऑटो रिक्षामध्ये फ्रंट सीट घेणाऱ्या २२७ चालकांवर कारवाई केली असुन विरुद्ध दिशेने वाहने दामटविणारे १४ वाहन चालक तावडीत सापडले आहेत. अशा एकुण १६८१ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांच्या धुळवडीचा रंग पोलिसांनी उतरवला.

# गॅलेक्सि कॉम्प्युटरच्या माध्यमातून सर्वसमावेशक शाळांचे विज्ञान प्रदर्शन

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०५, पेण (रायगड) :** नुकताच राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आल्यानंतर त्यालाच अनुसरून पेण मधील गॅलेक्सि कॉम्प्युटर आणि महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने पेण मधील काही शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष अरविंद वनगे आणि गॅलेक्सि कॉम्प्युटरच्या संचालिका आरती पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलेल्या या प्रदर्शनात विविध शाळांमधील १०४ वैज्ञानिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्याम ध्ये म. ना. नेने कन्या विद्यालय, आनंद शकत, गुरुकुल शाळा, कोनायसन्स, मदर तेरेसा, जय किसान विद्यामंदिर वडखळ, सार्वजनिक हायस्कूल पेण, अशा किरण या शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश होता. सदर आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनामध्ये आलेल्या प्रथम क्रमांकामध्ये इयत्ता सहावीच्या गटात अशा किरण शाळेच्या विहान झेमसे, सातवीच्या गटातील आनंद शाळेच्या वंश पाटील, आठवीच्या गटातील आनंद शाळेच्या आर्य साठे (राज्यस्तरीय प्रदर्शनात सहभाग) आणि नववीच्या गटातील एस व्ही देव शाळेतील राजस गांधी या वैज्ञानिक विद्यार्थ्यांनी अव्वल क्रमांक पटकावले. यावेळी बोलताना गॅलेक्सि कॉम्प्युटरच्या संचालिका आरती पाटील यांनी आत्ताच्या युगातील विद्यार्थ्यांमध्ये एवढे कलागुण कौशल्य भरले आहे की ते शिक्षणासोबत नव्या नव्या वेगवेगळ्या प्रयोगांची संकल्पना डोक्यात आणून




ते योग्य प्रमाणे साकारत आहेत. मात्र हे प्रात्यक्षिक नगरकांसमोर देखील येणे गरजेचे आहे या उद्देशाने आणि आत्ताच्या मुलांना कॉम्प्युटर चे ज्ञान देखील तेवढेच महत्वाचे आहे त्याचे मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने सदर प्रदर्शन आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संचालक अमोल पाटील, प्रवीण काळे सर, कोठारी सर, राजेंद्र जाधव, मढवी सर उपस्थित होते, तर परीक्षक म्हणून ईश्वरे सर, मढवी सर, अथर्व पाटील, श्रुती द्रविड यांनी जबाबदारी पार पाडली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपूर्वा साठे यांनी केले.

## बदलापूर स्थानकावरील संतापजनक घटना !

# फक्त ५ रुपयांसाठी महिलेला स्वच्छतागृहावर अडवलं, कपड्यातच लघुंशका

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, बदलापूर (ठाणे) :** एकीकडे मध्य रेल्वे मार्गावर लोकांची वाढलेली गर्दी आणि नेहमी चुकलेलं वेळापत्रक यामुळे मध्य रेल्वेच्याा सेवेचा बोजवारा उडाला आहे.रेल्वे स्थानकावर स्वच्छतागृहावर नेहमी प्रवाशी आणि ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांच्यासोबत वाद घालण्याचे प्रकार नेहमी घडत असतात. अशातच बदलापूर स्थानकावरून एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका महिलेली स्वच्छतागृहावर अडवण्याात आलं. त्यामुळे या महिलेला कपड्यात लघुशंका करण्याची वेळ आली, या घटनेमुळे तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आणि त्यांच्या समर्थकांनी बदलापूर स्थानकावर आंदोलन केलं.



मुंबई आणि उपनगरांमध्ये महिलांना स्वच्छतागृहांसाठी कायम झगडावं लागत आहे.

एकीकडे मेट्रो आणि मोनो रेल धावत आहे, पण अजूनही लोकल स्टेशनवर नीट स्वच्छतागृहांची सोय नाही. बदलापूर रेल्वे स्थानकावर ही घटना घडली आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर स्वच्छतागृह आहे. एक प्रवासी महिला स्वच्छतागृहात गेली होती. पण, या महिलेकडे ५०० रुपये होते, त्यामुळे सुट्टे ५ रुपये देण्याची अडचण निर्माण झाली.या महिलेनं विनंती केली, पण या महिलेला पुढे जाऊ दिलं नाही. त्यामुळे या महिलेला कपड्यात लघुशंका झाली, स्वच्छतागृहावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी या महिलेला अडवून ठेवण्यात आल्याचा आरोप कर आहे.

**स्वच्छतागृहाच्या कर्मचाऱ्यांवर होणार गुन्हे दाखल...**

ही माहिती कोकण शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना समजली. त्यानंतर म्हात्रे यांनी आपल्या समर्थकांसह बदलापूर स्थानकावर पोहोचले. त्यांनी कर्मचाऱ्यांना चांगलंच फैलावर घेतलं. या स्वच्छतागृहाच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली. आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी रेल्वे पोलिसांचं कार्यालय गाठलं आणि ठिय्या आंदोलन केलं. तब्बल ३ तास आंदोलन केल्यानंतर पोलिसांनी कारवाई करण्याचं आश्वासन दिलं.

# भायखळ्यातील बेलोसिस उड्डाणं पुलास 'राजमाता अहिल्यादेवी होळकर' यांचे नाव

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, मुंबई :** धनगर समाजाकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. नागपाडा ते ताडदेव या भागास जोडणारा भायखळ्यातील २०२४ साली बंद करण्यात आलेला बेलोसिस उड्डाणं पूल पुनर्निर्माण करून नव्याने बांधण्यात आला आहे. विशेष म्हणजे फार कमी अवधीत 'रेकॉर्ड ब्रेक' टायमिंग घेऊन युद्ध पातळीवर महायुती सरकारने हा उड्डाणं पूल बांधून स्थानिक नागरिकांच्या सोईसाठी खुला करण्यात आला आहे.

पायी चालणाऱ्यांसाठी यामध्ये पदपथाची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. त्याशिवाय या ब्रिजचे नूतनीकरण करून त्यास 'पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर' यांचे नाव देऊन नामविस्तार करण्यात आला आहे.

त्यामुळे धनगर बांधवांनी आनंद व्यक्त करीत उद्घाटन प्रसंगी उपस्थित असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानत मानाची पगडी घालून घोंगडी व काठी देऊन त्यांचा पारंपरिकरित्या सत्कार केला.

यावेळी नवी मुंबईचे जेष्ठ धनगर नेते तथा राष्ट्रीय स्वाभिमान संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन पुजारी यांच्यासह अर्जुन सलगर, दादासाहेब

**धनगर समाजाकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार**



पांढरे पाटील, दाजी मार्कड, नितीन जाधव, सुरेश टेळे, रशीद शेख, सुजित कोकरे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंदू स्मशानभूमींची स्वच्छता करत मंद्रूपचे युवक साजरी करतात धुळवड

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०५, सोलापूर :** शहरालगतच्या मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथील युवकांनी धुळवड निमित्ताने हिंदू स्म शानभूमींची स्वच्छता करून विधायक कृतिशीलता जपली. मागील ५ वर्षांपासून धुळवडीस

स्मशानभूमी स्वच्छता अभियान राबविण्यात येते. या उपक्रमात 'आम्ही मंद्रूपकर' उपक्रमातील युवक स्वयंस्फ ूर्तीने सहभाग घेतात. दहनशेडमधील राख झाडांना घालून परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला. काटेरी झाडी-झुडपांनी वेढलेली बसस्थानक परिसरातील हिंदू स्मशानभूमी काही तासांमध्ये स्वच्छ झाली. झाडून गोळा करण्यात आलेला दहा गाड्या कचरा- पालापाचोळा गोळा करून खत निर्मिती प्रकल्पास पाठविण्यात आला.

मंगळवारी (दि.३) सकाळी ६:३० वाजता स्वच्छता मोहिमेस सुरवात झाली. तरुणांनी हातामध्ये खराटा घेऊन स्मशानभूमी स्वच्छ करण्यास सुरवात केली. काहींनी काटेरी झुडपं तोडायला सुरु केले. तासाभरात १५ ते २० युवक जोडले गेले. स्वच्छता विभागाचे कर्मचाऱ्यांनी सहभागी झाले. मुकेश खराडे यांनी स्वच्छता मोहिमेसाठी शेत-शिवारातुन तुरीच्या काड्या गोळा करून स्वत: खराटे तयार केले. विकास शिळ्ळे, जगन्नाथ खरात यांनी दहनशेड मधील राख झाडांभोवती टाकून शेडची स्वच्छता केली. सिद्धेश्वर नंदुरे, सचिन साठे यांनी दहन शेडची स्वच्छता केली.

परिसर झाडून स्वच्छ केला. रवी केवटे यांनी अंत्यस्कारासाठी वापरलेले बांबूचा झाडांना आधार दिला. श्याम गोसावी, अक्षय झेंडेकर, नितीन खराडे यांनी स्मशाभूमीतील कचरा, इतर अनावश्यक वस्तू जाळून परिसर स्वच्छ केला. या स्वच्छता मोहिमेत अवघ्या आठ वर्षांचा रितुल गोसावी व ११ वर्षांची तनुजा केवटे या चिमुकल्यांनी खराटा हाती घेऊन स्मशानभूमीची स्वच्छता केली. मागील पाच वर्षांपासून सातत्याने सुरु असलेल्या स्मशाभूमी स्वच्छता अभियानाची प्रेरणा इतर गावांतील युवक मंडळांनी घेतली आहे. त्या गावातील युवक, तरुण मंडळ मंद्रूपच्या युवकांची प्रेरणा घेऊन स्वत:च्या गावातील स्म शाभूमीची स्वच्छता करून गावामध्ये विधायक कृतीशलता जपत आहेत.

**ग्रामपंचायतीचे योगदान...**

गावातील युवकांनी स्मशानभूमीची स्वच्छता मोहिम सुरु केल्याचे समजातच माजी सभापती अप्पाराव कोरे, ग्रामसेवक नागेश जोडमोटे यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना मदतीसाठी पाठविले. महिला सफाई कामगारांसह, लिपीक अमोल बाळगी, सतीश म्हेत्रे, वाहन चालक चॉद शेख आदी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता अभियानामध्ये सहभाग घेतला.

**यांनी घेतला पुढाकार...**

नितीन खराडे, मुकेश खराडे, सचिन साठे, रवी केवटे, जगन्नाथ खरात, विनोद कामतकर, रितूल गोसावी, तनुजा केवटे, ओंकार झेंडेकर



# खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचा उत्साहात शुभारंभ

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** औद्योगिक सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात ४ मार्च बुधवारी राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह २०२६ चा शुभारंभ उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. सुरक्षित, सजग आणि सक्षम कार्यसंस्कृती घडविण्याच्या निर्धाराने या सप्ताहाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य अभियंता गिरीश कुमारवार यांच्या हस्ते द्वीपपप्रज्वलन करून करण्यात आले. यंदाच्या सप्ताहाची संकल्पना लोकांना सहभागी करून, शिक्षित करून आणि सक्षम करून सुरक्षा वाढवूया अशी असून, सुरक्षिततेबाबत प्रत्येक घटकाने सक्रिय सहभाग नोंदवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अधोरेखित केले.

या प्रसंगी सुरक्षितता अधिकारी नितीन मोहोड यांच्या संकल्पनेतून साकारलेले इलेक्ट्रिकल फ्लॅशओव्हर चुकीला माफी नाही हे प्रभावी सुरक्षा पथनाट्य दिग्दर्शक महेंद्र राऊत व त्यांच्या पथकाने सादर केले. विद्युत अपघातांची कारणे, निष्काळजीपणाचे गंभीर परिणाम आणि सुरक्षा नियमांचे



काटेकोर पालन करण्याची अनिवार्यता या पथनाट्यातून ठळकपणे मांडण्यात आली. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या सादरीकरणास उत्स्फूर्त दाद दिली.

शून्य अपघात हे अंतिम उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी कामगारांनी मुख्य अभियंता कुमारवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षितता शपथ घेतली. कार्यस्थळी सुरक्षितता ही केवळ नियम ांपुरती मर्यादित नसून ती प्रत्येकाच्या जबाबदारीची जाणीव असल्याचा संदेश या शपथेच्या माध्यमातून देण्यात आला.

या प्रसंगी उपमुख्य अभियंता नारायण राठोड, नितीन रोकडे, सचिन देगवेकर, वित्त विभागाचे सहाय्यक म हाव्यवस्थापक नंदकिशोर सातकर,अधीक्षक अभियंता विलास उके, कमलेश मुनेश्वर, प्रवीण रोकडे, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, सुरक्षा अधिकारी नवीनकुमार सतीवले, कार्यकारी अभियंता संदीप देवगडे, संजय बंग, अजय पुंड, अतुल पवार, प्रदीप आखरे, अमित संगेवार, रमेश भेंडेकर तसेच अभियंते,कर्मचारी, कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व विभागांनी एकजुटीने सुरक्षिततेचा संदेश दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक तसेच सूत्रसंचालन अतिरिक्त सुरक्षितता अधिकारी पीयुष हर्षे यांनी केले.

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त संपूर्ण आठवडाभर विविध जनजागृती उपक्रम, सुरक्षा स्पर्धा, प्रशिक्षण सत्रे आणि मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून प्रत्येक विभागाने सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुरक्षितता विभागातील आशीष गावंडे, दिनेश तांडेकर, आकाश खाडे व उज्वला डोंगरे यांनी अथक परिश्रम घेतले.

सुरक्षितता हीच प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे, या संदेशाने राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाची प्रभावी सुरुवात झाली.

# धनोजे कुणबी प्रीमियर लीग बक्षीस वितरण समारंभ संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाज चंद्रपूर आयोजित धनोजे कुणबी प्रीमियर लीग (डीकेपीएल-१) २०२६ ही भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धा अत्यंत उत्साहात चंद्रपूर शहरातील सेंट मायकल शाळेच्या ग्राउंड वर संपन्न झाली. संपूर्ण स्पर्धे दरम्यान खेळाडूंनी दाखवलेला उत्साह, शिस्त आणि खेळाडूपणा खरोखरच प्रेरणादायी ठरला. या स्पर्धेत धनोजे कुणबी वणी या संघाने विजेतेपद पटकावले, तर धनोजे कुणबी वरोरा या संघाने उपविजेतेपद मिळवले. धनोजे कुणबी समाज बल्लारपूर संघाने तृतीय पारितोषिक तर धनोजे कुणबी समाज गोंडपिपरी संघाला चतुर्थ पारितोषिक पटकावले. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक म्हणून रुपये ७१,००० द्वितीय पारितोषिक रुपये ५१,०००, तृतीय पारितोषिक रुपये ३१,००० व चतुर्थ पारितोषिक रुपये ३१,००० अशी बक्षीस रक्कम उपस्थित मान्यवरांच्सा हस्ते देण्यात आली. सर्व विजेत्या व उत्कृष्ट संघांना, खा. प्रतिभा धानोरकर, आ. सुधाकर अडबाले, धनोजे कुणबी समाजाचे अध्यक्ष शीधरराव मालेकर, धनोजे कुणबी समाजाचे माजी अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम सातपुते, लोहारा इनचे संचालक चंदुजी वासाडे, बलशीव ट्रान्सपोर्टचे संचालक श्यामाकांतजी थेरे, नगरसेवक अजय बल्की, धनोजे कुणबी समाज वरोराचे अध्यक्ष ॲड. गजानन बोढाले, उपाध्यक्ष बंडुजी देऊळकर, सचिव अतुल देऊळकर व इतर मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.




खा. प्रतिभाताई धानोरकर म्हणाल्या की, धनोजे कुणबी समाज चंद्रपूरने सम ाजातील खेळाडूंसाठी चांगला प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिलेला असून भविष्यात या माध्यम ातून राष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडू तयार होतील व समाजाचा नावलौकिक वाढवतील अशी अपेक्षा व्यक्त करून स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबदल धनोजे कुणबी समाजाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. आ. सुधाकर अडबाले यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, खेळांमधूनच नेतृत्वगुण आणि सांघिक भावना वाढीस लागते, हे आजच्या खेळाडूंनी त्यांच्या कामगिरीतून दाखवून दिले. भविष्यात सुद्धा समाजाच्या वतीने होणाऱ्या क्रीडा स्पर्धेसाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले. धनोजे कुणबी प्रीमियर लीगचे संयोजक धनोजे कुणबी समाज मंडळ,चंद्रपूरचे उपाध्यक्ष संजय ढवस यांनी प्रास्तविक भाषणातुन सांगितले की, समाजातील खेळाडूंना संधी उपलब्ध व्हावी, म्हणून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तसेच भविष्यात अजून मोठया प्रमाणात धनोजे कुणबी प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

बक्षीस वितरण कार्यक्रमाचे संचालन ॲड. देवा पाचभाई तर आभार प्रदर्शन अतुल देऊळकर यांनी केले. या क्रिकेट प्रीमियर लीगच्या यशस्वीतेसाठी प्रा. रवींद्र झाडे, विपीन देऊळकर, पवन राजूरकर, ॲड. विलास माथनकर, ॲड. सतीश भोयर, विनोद गोवारदीपे, भाविक येरगुडे, पृथ्वीराज धानोरकर, कोमल मोहितकर, सचिन थिपे, सुहास पानघाटे, अभिजित पोटे, नितीन काळे, अविनाश बदखल, अनिल काळे, अनुप बोर्डे, रुणाल आसूटकर, रंजित डवरे, निखिल जोगी, अक्षय येरगुडे, सूचित पिंपळशेंडे, अरविंद उलमाले यांनी परिश्रम घेतले. या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेणारे आयोजक, पंच, समालोचक, स्वयंसेवक, प्रायोजक, मान्यवर पाहुणे तसेच क्रिकेटप्रेमी प्रेक्षक या सर्वांचे धनोजे कुणबी समाज चंद्रपूरच्या वतीने आभार मानण्यात आले.

# मोहनराव रोकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा प्रवक्तेपदी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) एकनिष्ठ कार्यकर्ते मोहनराव रोकडे यांची अहिल्यानगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रवक्ते पदावर निवड जाहीर झाली आहे. ही घोषणा पारनेर येथे झालेल्या पक्षाच्या नियोजित बैठकीत खासदार निलेश लंके यांच्या आदेशाने करण्यात आली. मोहनराव रोकडे हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसशी प्रामाणिकपणे जोडले गेले आहेत. पक्ष स्थापनेपासूनच त्यांनी पक्षासाठी अथक परिश्रम केले आहेत. पारनेर तालुक्यातील अति दुर्गम आदिवासी भागात काम करणारे रोकडे सर्वसामान्य जनतेचा नेता म्हणून ओळखले जातात. त्यांचा जिल्हाभर आणि तालुक्यात मोठा जनसंपर्क असून, लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी ते नेहमी तत्पर राहतात.


खासदार निलेश लंके यांच्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान म ोहनराव रोकडे यांनी महत्त्वपूर्ण नियोजन आणि भूमिका बजावली होती. खासदार लंके यांच्यासोबतची त्यांची जवळीक, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची पद्धत आणि शरदचंद्र पवार साहेबांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याची त्यांची सातत्यपूर्ण तळमळ यामुळे त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे.

पक्षाच्या या निर्णयाचे पारनेर तालुका आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेतून उत्स्फूर्त स्वागत होत आहे. मोहनराव रोकडे यांच्या जिल्हा प्रवक्तेपदामुळे पक्षाची तळागाळातील ताकद अधिक मजबूत होईल आणि जनतेच्या आवाजाला अधिक प्रभावीपणे मांडता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बेपत्ता तरुणाचा पालम पोलिसांनी एका दिवसात लावला छडा

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०५ पालम (परभणी) :** पालम शहरातील बालाजी नगर परिसरातील शेख इरफान शेख सलीम (वय २०) हा तरुण ३ मार्च रोजी पालमपासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या मौजे गुळखंड येथे नमाज पठणासाठी जात असल्याचे सांगून घरातून निघून गेला होता. मात्र रात्री उशिरापर्यंत तो घरी परतला नाही. दरम्यान, काही अज्ञात इसमांनी त्याला ऑटोमध्ये जबरदस्तीने नेल्याची अफवा परिसरात पसरल्याने मोठी खळबळ उडाली. या अफवेच्या पार्श्वभूमीवर पालम पोलीस ठाण्यात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.



या परिस्थितीत पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे यांनी प्रसंगावधान राखत जमावाला शांत केले आणि बेपत्ता तरुणाचा शोध घेण्यासाठी तात्काळ हालचाली सुरू केल्या. तरुणाचा मोबाईल फोन ट्रेस करून मिळालेल्या माहितीनुसार पोलीस उपनिरीक्षक प्रकाश लोखंडे व पोलीस कॉन्स्टेबल भरतसिंग ठाकूर यांच्या पथकाला पंढरपूरमार्गे सोलापूर येथे रवाना करण्यात आले.

पोलीस पथकाने सोलापूर रेल्वे स्टेशन परिसरातील मोदी चौक येथे स्थानिक पोलीस स्टेशनची मदत घेत शोधमोहीम राबवून शेख इरफान याला ताब्यात घेण्यात यश मिळवले. आज, दि. ५ मार्च रोजी पहाटे सुमारे पाच वाजता त्याला पालम येथे आणून कुटुंबीयांच्या सुखरूप स्वाधीन करण्यात आले. या प्रकरणात तरुणाचे अपहरण झाले नसून तो स्वतः हून घरातून निघून गेल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे यांनी दाखवलेल्या समयसूचकतेमुळे अवघ्या एका दिवसात बेपत्ता तरुणाचा छडा लागल्याने त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.